आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in | सोमवार दिनांक 13/07/2026 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 154 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# मोशी दुर्घटना मानवनिर्मित; आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा – सुषमा अंधारे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील दुर्घटना ही नैसर्गिक नसून पूर्णपणे मानवनिर्मित असल्याचा गंभीर आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे.**

**या प्रकरणात महापालिका आयुक्त, प्रकल्प अधिकारी आणि संबंधित जबाबदारांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली.**



दुर्घटनास्थळी भेट दिल्यानंतर पत्रकारांशी बोलताना अंधारे म्हणाल्या की, “निष्पाप कामगारांचा जीव गेला असून केवळ आर्थिक मदत जाहीर करून प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. मृतांच्या कुटुंबीयांना न्याय मिळालाच पाहिजे.”त्या पुढे म्हणाल्या, “राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आलेली पाच लाख रुपयांची मदत ही जखमेवर मीठ चोळण्यासारखी आहे. या दुर्घटनेतील दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. शिवसेना या प्रकरणात न्यायालयीन लढाई लढणार असून मृत आणि बाधित कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत पाठपुरावा करणार आहे.”मोशी दुर्घटनेनंतर शहरात संतापाची लाट उसळली असून विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांकडून जबाबदारांवर कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

# मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील जखमी कामगारांची खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतली भेट

## दोषींवर कठोर कारवाई आणि मृत-जखमींना योग्य मोबदला देण्याची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड:मोशी येथील वेस्ट टू एनर्जी (कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती) प्रकल्पातील भीषण दुर्घटनेनंतर बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी साईनाथ हॉस्पिटलला भेट देत जखमी कामगारांची विचारपूस केली. कचऱ्याच्या प्रचंड ढिगाऱ्याखाली दबून कामगारांचा झालेला मृत्यू अत्यंत अस्वस्थ करणारा असून, ही घटना शासकीय व प्रशासकीय निष्काळजीपणाचे गंभीर उदाहरण असल्याचे त्यांनी म्हटले.**



काल रात्री साईनाथ हॉस्पिटल येथे जाऊन सुप्रिया सुळे यांनी दुर्घटनेतून बचावलेल्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. जखमी कामगारांनी त्या थरकाप उडवणाऱ्या घटनेचे अनुभव सांगताना कचऱ्याचा ढिग अचानक कोसळल्याने कसा जीव वाचवण्यासाठी संघर्ष करावा लागला, याची माहिती दिली. यावेळी त्यांनी उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून जखमींवर तातडीने आणि योग्य उपचार करण्यात यावेत, अशा सूचना दिल्या.

“या दुर्घटनेत नऊ निष्पाप कामगारांना प्राण गमवावे लागले, तर अनेक कामगार गंभीर जखमी झाले आहेत. शासन आणि प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे ही दुर्दैवी घटना घडली आहे. संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच मृत आणि जखमी कामगारांना योग्य व उचित मोबदला देण्यात यावा.”

### घनकचरा व्यवस्थापनाबाबत कठोर धोरणाची गरज

मोठ्या शहरांमधील घनकचरा व्यवस्थापन आणि त्याचा पुनर्वापर यासंदर्भात राज्य शासनाने ठोस व दीर्घकालीन धोरण आखण्याची गरज असल्याचेही खासदार सुळे यांनी अधोरेखित केले. प्रत्येक शहरासाठी शास्त्रोक्त पद्धतीने कचरा प्रक्रिया करण्याची व्यवस्था आणि त्यासाठी कठोर कालमर्यादा निश्चित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

“कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नाकडे केवळ प्रशासनिक काम म्हणून न पाहता, तो नागरिकांच्या जीविताशी संबंधित विषय आहे. शासनाने गांभीर्याने विचार करून भविष्यात अशा दुर्घटना पुन्हा घडणार नाहीत, याची काळजी घ्यावी,” असेही त्या म्हणाल्या.

### मृत कामगारांना श्रद्धांजली

मोशी दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नऊ कामगारांना सुप्रिया सुळे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात आपण सहभागी असल्याचे सांगत, पीडित कुटुंबांना शासनाने तातडीने आर्थिक मदत आणि सर्वतोपरी सहकार्य द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

# शिक्षक हे समर्पण भावनेने काम करतात - महापौर रवी लांडगे

# शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात प्रथम आलेल्या क्षितिजय नप्ते चा सत्कार संपन्न

## • महात्मा फुले विद्यालयातील शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांची भव्य मिरवणूक

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी, पुणे (दि. 11 जुलै 2026) भोसरी मधील महात्मा फुले विद्यालय आणि पिंपरी चिंचवड शहरातील शासकीय अनुदानित शाळेतील शिक्षक हे समर्पण भावनेने काम करतात हे अभिमानास्पद आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी केले.**



भोसरी येथील महात्मा फुले जागृती संस्थेच्या महात्मा फुले विद्यालयातील क्षितिजय नप्ते याने इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे, त्याचा व इतर यशस्वी विद्यार्थ्यांचा आणि या विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका मंगल आहेर - गावडे या सर्वांचा सत्कार महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ माजी नगरसेवक व भोसरी येथील महात्मा फुले जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष वसंत लोंढे, नगरसेवक विराज लांडे, सोनाली गव्हाणे, माई पठारे, संस्थेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत रासकर, शिवलिंग ढवळेश्वर, दिगंबर ढोकळे, मुख्याध्यापक सुलभा चव्हाण, मोहन वाघुले, सुलोचना वसंत लोंढे, शिक्षक, यशस्वी विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते. तत्पूर्वी गुणवंत विद्यार्थ्यांची भोसरी गावठाण परिसरातून मिरवणूक काढण्यात आली.

संस्थेचे उपाध्यक्ष श्याम लोंढे, अनिल लोंढे, सोमनाथ रासकर, सचिव संतोष लोंढे, उपसचिव संदीप लोंढे, खजिनदार वृषभ रासकर, सह खजिनदार दीपक लोंढे, महेश लोंढे, हिशोब तपासणीस विजय लोंढे, सह हिशोब तपासणीस अतुल रासकर, सभासद तुषार लोंढे, संकेत लोंढे, सिद्धेश लोंढे, अमित लोंढे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला होता.

यावेळी महापौर रवी लांडगे यांनी सांगितले की, या संस्थेचे अध्यक्ष नाना लोंढे हे आमचे गुरु आहेत. त्यांनी कामगार, उद्योग, सहकार, व्यापार, अध्यात्म, राजकीय अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. आता त्यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती करायचे ठरवले आहे. भोसरी मधील विद्यार्थी आता शहरात शैक्षणिक क्रांती करतील असा विश्वास आहे. मी देखील वाबळेवाडी येथील दत्तात्रय वारे गुरुजी यांच्या शाळेचा आदर्श डोळे पुढे ठेवून वैयक्तिक खर्चाने एक शाळा विकसित करीत आहे. वाबळेवाडीतील शाळेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 132 शाळांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे शाळा बाह्य शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

तसा पथदर्शी प्रकल्प म्हणून काम सुरु केले आहे. आगामी काळात पिंपरी चिंचवड शहर गुणवंतांचे शहर म्हणून नावारूपाला येईल असा विश्वास महापौर रवी लांडगे यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी गुणवत्ता यादीतील क्षितीजय नप्ते, वेदांत गोरडे, तनिष्का केदार, वैदिक कदम, ऋग्वेद गावडे, प्रत्यंचा गायकवाड, विणा पाटील, ध्रुव दैन, प्रज्वल काटे, वेदिका बऊरे, हर्षदा खांडेकर, वेदांत बंडगर, अमित कुलुंगे, स्वरा पामलवाड, स्वरा जगताप, ज्ञानेश लांडे, हर्षाली बावा, श्लोक गायकवाड, सार्थक सावंत, श्रेया जगताप, स्वराज शेळके, ईश्वरी टाकसाळ, युगंधरा ठाकूर आणि अनुष्का घाडगे, भावेश कोल्हे तसेच प्रतीक शिंदे (10 वी मध्ये 95.85 टक्के गुण) या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. स्वागत, प्रास्ताविक वसंत लोंढे, सूत्र संचालन शरद कणविर आणि आभार सुलभा चव्हाण यांनी मानले.

# पानशेत जलप्रलयास 65 वर्ष पूर्ण, खडकवासला धरणाची दीप्ती चवधरी यांनी काँग्रेस पक्षातर्फे ओटी भरली.

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**65 वर्षांपूर्वी 12 जुलै 1961 रोजी पुण्याजवळील पानशेत हे मातीचे धरण अती पावसामुळे फुटले आणि पुण्याचे अतोनात नुकसान झाले. वित्त व जीवित हानी झाली. या घटनेचे स्मरण म्हणून आज खडकवासला धरण येथे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी यांनी खडकवासला धरण येथे धरणातील पाण्याची पूजा करून साडी-चोळी, नारळाने ओटी भरली आणि खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर ही पुण्याला पाणी पुरवठा करणारी चारही धरणे सदैव सुरक्षित व पाण्याने सदैव भरलेली रहावित अशी प्रार्थना केली.**



याप्रसंगी पुणे जिल्हा काँग्रेस अध्यक्ष लहू अण्णा निवंगुणे, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास मते, पुणे काँग्रेस खडकवासला विधानसभा अध्यक्ष सुरेश मते, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) खडकवासला विधानसभा अध्यक्ष संदिप मते, पुणे शहर काँग्रेस सरचिटणीस आबा जगताप, प्रदेश महिला सेक्रेटरी अर्चना शहा, पुणे जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष अवधूत मते, राजाभाऊ कदम, गुलाम हुसेन खान, मुरलीधर मते, विशाल पवार, विलास आबा मते, शांताराम मते, माजी सरपंच विजय कोल्हे, धनंजय पाटील, शांताराम मते, विजय लगड, अतुल कारले, नरसिंह आंदोली, अजय खुडे, तुळशीदास मते, प्रशांत नांदगुडे, महेश शिंदे आदी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच याप्रंगी ग्रामस्थही मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी अनेक ज्येष्ठ नागरिकांनी पानशेत पूराच्या आठवणी जागवल्या. 1965 वर्षांपूर्वीच्या पानशेत प्रलयानंतर पुणेकरांची मोठी हानी झाली. पुणे त्यानंतर पहिल्यांदा मोठ्या प्रमाणात बदलले. त्या संकट काळात पुणेकरांनी मोठ्या धीराने या संकटाला तोंड दिले. अशी आपत्ती पुन्हा येऊ नये यासाठी धरणांची वेळोवेळी तपासणी करणे, धरणातील गाळ काढणे आणि पुण्याची जीवनवाहिनी असणारी मुठा नदी अधिक खोल करून सुरक्षित ठेवण्यावर भर दिला गेला पाहिजे असे दीप्ती चवधरी याप्रसंगी म्हणाल्या. या प्रलयाची माहिती देताना दीप्ती चवधरी म्हणाल्या की, 12 जुलै, 1961 रोजी, सह्याद्रीतील आंबी नदीवरील नव्याने बांधलेल्या मातीच्या धरणाची भिंत मुसळधार पावसामुळे कोसळून पानशेत धरण फुटले. या विनाशकारी पुराचे पाणी पुण्यात शिरले, ज्यात अनेकांचा बळी गेला, 65,000 रहिवासी विस्थापित झाले आणि डेक्कन जिमखाना, नारायण पेठ, शनिवार पेठ, कसबा पेठ, सोमवार पेठ अशा नदी किनारच्या भागात शेकडो घरे उध्वस्त झाली. यासारख्या परिसरांचे मोठे नुकसान झाले.

11 जुलै रोजी उशिरा धोक्याची जाणीव झाली असली तरी, भारतीय लष्कराने वाळूच्या पोत्यांनी रचना मजबूत करण्याच्या केलेल्या शौर्यपूर्ण प्रयत्नांमुळे काही मौल्यवान तास वाचले. याबद्दल भारतीय लष्कराचे पुणेकरांच्या वतीने दीप्ती चवधरी यांनी आभार मानले. धरणफुटी अखेरीस 12 जुलै रोजी सकाळी 7 वाजून 13 मिनिटांनी झाली. मुठा नदीतून वेगाने वाहत आलेली पुराची प्रचंड लाट सकाळी 10 वाजेपर्यंत पुण्यात पोहोचली, ज्यामुळे शनिवार पेठ, नारायण पेठ, कसबा पेठ यांसारख्या भागांमधील तळमजले आणि पहिले मजले 25 फुटांपर्यंत पाण्याखाली गेले. अशी आपत्ती पुणेकरांवर पुन्हा येऊ नये यासाठी हे जलपूजन करून ओटी भरण्यात आली असे त्या म्हणाल्या.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आबासाहेब जगताप यांनी केले.

# थेरगावात जुन्या वादातून चाकूहल्ला पिता-पुत्राला धमकी देत दोघांना गंभीर जखमी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : युनूस खतीब**

**थेरगाव परिसरात जुन्या वादाच्या रागातून एका पेंटरवर भरदिवसा चाकूने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात फिर्यादीसह त्यांच्या सहकाऱ्यालाही गंभीर दुखापत झाली असून वाकड पोलिसांनी आरोपीविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 11 जुलै रोजी सकाळी पवारनगर येथील पानटपरीजवळ अविनाश बाबर आणि त्यांचे कॉन्ट्रॅक्टर विजय भोईर हे कामासाठी मजूर शोधत थांबले होते. यावेळी अभि उर्फ अभिषेक कोळेकर याने जुन्या भांडणाचा राग मनात धरून अविनाश बाबर यांच्याशी वाद घालत त्यांच्या मुलाला ठार मारण्याची धमकी दिली.यानंतर मोबाईल नंबर मागण्याचा बहाणा करून आरोपीने अचानक धारदार चाकू काढत अविनाश बाबर यांच्यावर वार केले. तसेच मध्ये पडलेल्या विजय भोईर यांच्या पाठीवरही चाकूने हल्ला करून त्यांना जखमी केले. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.या प्रकरणी अभि उर्फ अभिषेक कोळेकर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम 109(1) व 251(2)(3) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास वाकड पोलीस करीत आहेत.

# PMPL बसच्या धडकेत चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू पुनावळे परिसरातील हृदयद्रावक घटना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : युनूस खतीब**

पुनावळे परिसरात पीएमपीएमएल बसच्या धडकेत एका चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी घडली. या अपघातानंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून रावेत पोलिसांनी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 11 जुलै रोजी सकाळी सव्वा अकराच्या सुमारास पुनावळे ते किवळे मार्गावरील पवना पुलाजवळ, तुकाई नर्सरीजवळील सर्व्हिस रोडवर हा अपघात झाला. पीएमपीएमएल बस (MH 12 QG 2079) चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत एका वाहनाला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. यावेळी बसची फिर्यादी यांच्या दुचाकीला धडक बसली.धडकेमुळे दुचाकीवरील नियंत्रण सुटून फिर्यादी आणि त्यांची मुलगी खाली पडल्या. यामध्ये खुशबू या चिमुकलीचा बसच्या मागील चाकाखाली येऊन जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

रावेत पोलिसांनी बस चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.



# चाकणमध्ये अंमली पदार्थांवर पोलिसांचा मोठा प्रहार; ८.२९ किलो गांजासह एक जेरबंद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : युनूस खतीब**

चाकण दक्षिण पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधात धडक कारवाई करत 8.290 किलो गांजा जप्त केला असून एका आरोपीला अटक केली आहे. जप्त केलेल्या गांजाची किंमत सुमारे 4 लाख 14 हजार 600 रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.10 जुलै रोजी नाणेकरवाडी येथील जीएमपी ऑटो कंपनीच्या मागील मोकळ्या जागेत ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी दिलीप मधुकर शिंदे (रा. मेदनकरवाडी, ता. खेड) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात गांजा जप्त करण्यात आला.

चौकशीदरम्यान हा गांजा समीर तडवी नावाच्या व्यक्तीकडून आणल्याची माहिती आरोपीने दिली. त्यानुसार समीर तडवी याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला असून तो सध्या फरार आहे. दोन्ही आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईमुळे चाकण परिसरातील अंमली पदार्थांच्या अवैध नेटवर्कवर मोठा आघात झाल्याचे मानले जात असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोते करीत आहेत.



# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड नको; पावसामुळे झालेल्या नुकसानीवर तातडीने उपाययोजना करा – महापौर रवि लांडगे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी, दि. 12 जुलै 2026 :- क्रांतिवीर चाफेकर स्मारक समिती संचलित पुनरुत्थान समरसता गुरुकुलम् तसेच क्रांतिवीर चाफेकर प्राथमिक विद्यामंदिर येथे मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची व झालेल्या नुकसानीची महापौर रवि लांडगे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित महापालिका अधिकाऱ्यांना दिल्या.**




पाहणीदरम्यान शैक्षणिक इमारतीचा परिसर, पावसाच्या पाण्यामुळे बाधित झालेली ठिकाणे, पाणी वाहून जाण्याची व्यवस्था, संरक्षक भिंतीलगतचा परिसर तसेच विद्यार्थ्यांच्या दैनंदिन वावराच्या ठिकाणांची पाहणी करण्यात आली. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर भविष्यात कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी संबंधित विभागांनी केवळ तात्पुरत्या स्वरूपाची दुरुस्ती न करता आवश्यकतेनुसार तांत्रिक पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना प्रस्तावित कराव्यात, असे निर्देश महापौर लांडगे यांनी दिले.

परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी ड्रेनेज व स्टॉर्म वॉटर व्यवस्थेची तातडीने तपासणी करावी, नुकसान झालेल्या बांधकाम व संरचनात्मक भागांची सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत पाहणी करावी, धोकादायक अथवा असुरक्षित ठिकाणे तातडीने सुरक्षित करावीत तसेच विद्यार्थ्यांच्या वावराच्या परिसरात आवश्यक प्रतिबंधात्मक सुरक्षा उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

तसेच, संबंधित क्षेत्रीय कार्यालयाने संस्थेच्या प्रतिनिधींशी समन्वय साधून झालेल्या नुकसानीचा सविस्तर आढावा घ्यावा. आवश्यक कामांचे प्राधान्यक्रम निश्चित करून तातडीच्या कामांना विलंब न करता सुरुवात करावी आणि करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा, अशाही सूचना महापौर लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.महापौर रवि लांडगे म्हणाले, "विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा अत्यंत संवेदनशील आणि सर्वोच्च प्राधान्याचा विषय आहे. अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या अडचणींचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर अथवा त्यांच्या सुरक्षिततेवर परिणाम होणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घेतली पाहिजे. आवश्यक तांत्रिक उपाययोजना तातडीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण कराव्यात. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत कोणतीही दिरंगाई स्वीकारली जाणार नाही."

यावेळी मा. नगरसदस्य सुरेश भोईर, क्षेत्रीय अधिकारी गोरख लिमन, कार्यकारी अभियंता चंद्रकांत मुठाळ, आरोग्य निरीक्षक महेश जगताप तसेच संबंधित अधिकारी व संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते

# मोशी कचरा डेपो दुर्घटना प्रकरणी,अधिकारी व कंत्राटदारांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा ! - संदीप वाघेरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - मोशी येथे कचऱ्याचा डोंगर कोसळून घडलेल्या दुर्घटने प्रकरणी पर्यावरण विभागाचे संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी राष्ट्रवादीचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी केली आहे.**




यासंदर्भात संदीप वाघेरे यांनी म्हटले आहे की, मोशी येथे कचऱ्याचा डोंगर कोसळून इमारत कोसळण्याची घटना घडली. या घटनेत 23 जण अडकून पडले होते त्यापैकी 15 जणांची सुटका करण्यात आली.मात्र एकाचा मृत्यू झाला आठ जण अजूनही अडकले आहेत. एनडीआरएफने, अग्निशामक दल यांनी बचाव कार्य चांगल्या पद्धतीने केले आहे कचरा मागच्या बाजूने हटवून प्रवेश करण्याचा आणि बचाव कार्य प्रभावी करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. कचऱ्यामुळे मिथेन वायूचे प्रमाण जास्त आहे.बचाव कार्य सुरु आहे . मात्र बचाव कायासाठी अधिक यंत्रणा लावणे गरजेचे होते . ती न लावल्याने अनेक निरपराध लोकांचे, गरीब कामगारांचे जीव गेले आहेत . असे वाघेरे म्हणाले.

पावसामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे हा डोंगर कोसळल्याचे आयुक्त सांगत आहेत मात्र पावसामुळे हा डोंगर कोसळून दुर्घटना घडू शकते याची महापालिकेला कल्पना नव्हती का आणि पर्यावरणाचे नावाखाली दुकानदारी करणारे अधिकारी संजय कुलकर्णी आणि अल्हाट तसेच ठेकेदार ऐंथनी काय करत होते असा सवाल वाघेरे यांनी केला आहे.

याप्रकरणी पर्यावरण विभागाचा अधिकारी संजय कुलकर्णी आणि आल्हाट यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे.पिंपरी चिंचवडकरांचे कराचे लाखो रुपये बायोमायनिंग वर खर्च झाले. त्यातून फलनिष्पत्ती काहीच झाली नाही. उलट मोशी येथील दुर्घटनेमुळे काहींचे जीव गेले. महापालिकेची बदनामी झाली. त्यामुळे संजय कुलकर्णी आणि संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी वाघेरे यांनी केली आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968